**नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती वेतन व उपदानाची रक्कम वेळेवर प्रदान न केल्यास द्यावे लागणाऱ्या व्याजाची भरपाई विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेकडून वसुलात आणणेबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र. नपसु २००२/प्र.क्र.१०५/२००२/६
दिनांक ३१ मे, २००२

महाराष्ट्रातील नगरपरिषदांच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात येत असल्याबाबत या संचालनालयाचे वतीने आदेश क्र.ईएसटी ११८४/सीआर २१/५ दिनांक १४ मे १९८४ अन्वये कळविण्यात आलेले होते, व त्याप्रमाणे नगरपरिषदेने नगरपरिषद आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदींचे सर्व अनुज्ञेय लाभ देणे गरजेचे आहे. तथापि या संचालनालयाचे असे निदर्शनास आलेले आहे की, दिनांक १४.५.१९८४ नंतर काही नगरपरिषदा त्यांचे आस्थापनेवर सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील तरतूदीनुसार परिपूर्ण लाभ देत नाहीत. निवृत्तीवेतन, उपदान वेळेवर देण्याच्या दृष्टीने दक्षता घेत नाहीत व त्यामुळे असे कर्मचारी मा.लोक आयुक्त यांचेकडे तक्रारी करतात.

०२. या संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा नियम (निवृत्ती वेतन) १९८२ मधील नियम १२९ खाली महत्वाची तरतूद अशी आहे.

**``१२९ ए-विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या उपदानावर व्याज``**

१) उपदानाचे प्रदान ते देय झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्यानंतर प्राधिकृत करण्यात येवून रक्कम प्रदान करण्यास प्रशासकीय चूक कारणीभूत असल्याचे स्पष्टपणे सिध्द झाले तर उपदानाच्या रकमेवर तीन महिन्यानंतरच्या कालावधीसाठी खालील दराने व्याज देण्यात येईल.

(एक) तीन महिन्यानंतर, परंतू एक वर्षापर्यत दरसाल ७%

(दोन) एक वर्षानंतर दरसाल १०%

परंतू असे की उपदानासंबंधीच्या नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात कर्मचाऱ्याने कसूर केल्यामुळे विलंब झाला असेल तर व्याज देय होणार नाही. आणखी असे की, ज्या प्रकरणी तात्पुरते उपदान मंजूर करण्यात आले असेल त्या प्रकरणी व्याज देय होणार नाही.

**``१२९ बी-विलंबाने प्रदान करण्यात आलेल्या निवृत्तीवेतनावर व्याज``**

१) जर निवृत्तीवेतनाचे प्रदान ते देय झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यानंतर प्राधिकृत करण्यात आले असेल आणि रक्कम प्रदान करण्यातील विलंब हा प्रशासनिक चुकीमुळे झाला असे स्पष्टपणे प्रस्थापित झाले असेल तर, निवृत्तीवेतनाच्या रकमेवर सहा महिन्यानंतरच्या कालावधीसाठी दरसाल १० टक्के दराने व्याज देण्यात येईल.

परंतू असे की, ज्या प्रकरणात नेमून दिलेल्या कार्यपध्दतीचे पालन करण्यात कर्मचाऱ्याने कसूर केल्यामुळे निवृत्तीवेतनाचे प्रदान करण्यास विलंब झाला असल्यास व्याज देय होणार नाही. तसेच ज्या कालावधीसाठी व्याज देय होणार नाही. ज्या शासकीय कर्मचाऱ्याला तात्पुरते निवृत्तीवेतन मंजूर केले असेल त्या प्रकरणी, तात्पुरत्या निवृत्तीवेतनाचे प्रदान बंद झाल्यानंतर सहा महिन्यांचा कालावधी उलटल्यापासून अंतिम निवृत्तीवेतन प्राधिकृत करेपर्यतच्या कालावधीसाठी विहीत तरतूदीनुसार व्याज देण्यात येईल.

२) वित्त विभागाच्या संमत्तीने जेथे व्याजाचे प्रदान प्राधिकृत करण्यात आले असेल अशा सर्व प्रकरणात, संबंधीत विभाग जबाबदारी निश्चित करुन निवृत्तीवेतन प्रदानाचे विलंबास जबाबदार असल्याचे आढळून आलेल्या संबंधीत शासकीय कर्मचाऱ्याविरुध्द अथवा कर्मचाऱ्यांविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करील आणि निवृत्तीवेतन प्रदानाचे विलंबास जबाबदार असल्याचे आढळून आलेल्या अधिकाऱ्यासहित, शासकीय कर्मचाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून देय झालेल्या व्याजाची रक्कम वसूल करील.

०३. सर्व नगरपरिषद अध्यक्ष, मुख्याधिकारी, लेखा अधिकारी व संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांना असे निदेश देण्यात येत आहेत कशी, त्यांनी वर उदधृत केलेल्या तरतूदीकडे विशेष लक्ष द्यावे. त्यानुसार वेळीच कार्यवाही करावी आणि यापुढे निवृत्तीवेतनास किंवा उपदान रकमेच्या प्रदानास विलंब झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियमातील तरतूदीनुसार द्याव्या लागणाऱ्या व्याजाची जबाबदारी तात्काळ निश्चित करुन ती संबंधीतांचे वेतन व भत्ते इत्यादी देय रकमेतून वसुलात आणण्यात यावी.

०४. नगरपरिष्दांचे वार्षिक प्रशासकीय तपासणीचेवेळी तपासणी करणाऱ्या कार्यालयाने उपनिर्दिष्ट कार्यवाहीबाबत सखोल आढावा घ्यावा.

( भगवान सहाय )
संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) अध्यक्ष, नगरपरिषद (सर्व)
२) मुख्याधिकारी नगरपरिषद (सर्व)
३) जिल्हाधिकारी-मुंबई व बृहन्मुंबई वगळून (सर्व)

प्रत माहितीसाठी अग्रेषित.

१) मा.सचिव, नगर विकास विभाग, मुंबई.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, सर्व.
३) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
४) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपूर.